धारावी पुनर्विकास प्रकल्प
झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण
५ वा मजला, गृहनिर्माण भवन,
वांद्रे (पूर्व), मुंबई - ४०० ०५१.
दूरध्वनी : ०२२-२६५९९५९४/२८७५.

## नोटीस

महाराष्ट्र प्रादेशिक व नगर रचना अधिनियम, १९६६.

धारावी अधिसूचित क्षेत्राच्या विकासाबाबतच्या मंजूर नियोजन प्रस्तावामध्ये फेरबदलाबाबतचा प्रस्ताव.

क्र.झोपुप्रा/धापुप्र/न.र./न.क्र.२३५-सी /६४ /२०१८, दिनांक ०५.०३.२०१८

ज्या अर्थी महाराष्ट्र झोपडपट्टी (सुधारणा, निर्मूलन व पुनर्विकास) अधिनियम कायदा, १९७१ अनुसार स्थापन झालेल्या झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरणाची (यापुढे ज्यांचा उल्लेख "उक्त प्राधिकरण" असा करण्यात आला आहे), महाराष्ट्र प्रादेशिक व नगर रचना अधिनियम, १९६६ च्या कलम ४० (१ ख) अनुसार शासनास प्राप्त झालेल्या अधिकारांचा वापर करून महाराष्ट्र शासनाने अविकसित असलेल्या धारावी क्षेत्राचा सर्वकष विकास होण्याच्या उद्देशाने नगर विकास विभागाच्या दि.०९ मार्च, २००५ च्या अधिसूचना क्रमांक टिपीबी-४३०४/३२२/सीआर-५६/०४/नवि-११ अन्वये खाली नमूद केल्याप्रमाणे

| अ.क्र. | चतुर्सीमा | लागू मिळकत |
|---|---|---|
| १. | उत्तरेस | संत रोहिदास मार्ग. |
| २. | उत्तर-पश्चिम | सायन बांद्रा लिंक रोड, मिठ्ठी नदी, माहिमची खाडी |
| ३. | उत्तर पुर्वेस | संत रोहिदास मार्ग व लालबहादुरशास्त्री मार्गच्या जंक्शन. |
| ४. | पूर्वेस | मध्य रेल्वे लोहमार्ग |
| ५. | दक्षिण पूर्वेस | हार्बर लोहमार्ग. |
| ६. | पश्चिमेस | पश्चिम रेल्वे, हार्बर लोहमार्ग. |
| ७. | दक्षिण पश्चिमेस | हार्बर लोहमार्ग. |

व २५ जून, २००९ च्या अधिसूचना क्रमांक टिपीबी-४३०९/३४९९/प्र.क्र.८३/०९/नवि- ११ अन्वये खाली नमूद केल्याप्रमाणे

| अ.क्र. | चतुर्सीमा | लागू मिळकत |
|---|---|---|
| १. | उत्तरेस व उत्तरपूर्वेस | मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाच्या अधिसुचना क्रमांक बीकेआर ११७७/२६२/ UD-५ दि.०९ एप्रिल १९७९ अन्वये मंजूर केलेल्या बांद्रा कुर्ला संकुलाच्या "एच ब्लॉक" ची सिमारेषा. |

| | | |
|---|---|---|
| २. | पूर्वेस | मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाच्या अधिसुचना क्रमांक बीकेआर ११७७/२६२/UD-५ दि.०९ एप्रिल १९७९ अन्वये मंजूर केलेल्या बांद्रा कुर्ला संकुलाच्या येथील "एच ब्लॉक" च्या सिमारेषा पलिकडील Refuse Transfer Station. |
| ३. | दक्षिण पूर्वेस | लालबहादुरशास्त्री मार्ग. |
| ४. | दक्षिणेस | संत रोहिदास मार्गाकडील दक्षिण बाजूची सिमारेषा. |
| ५. | पश्चिमेस व दक्षिणपश्चिमेस | सर्व्हे क्रमांक ६६५ (पिवळा बंगला) ची पश्चिमेकडील सिमारेषा व नकाशावर दाखविल्याप्रमाणे राजीव गांधी झोपडपट्टीची समाविष्ट करणारी एच ब्लॉकची हद्द. |

या दोन्ही क्षेत्रे मिळून एकत्रितपणे होणा-या धारावी अधिसूचित क्षेत्रासाठी (यापुढे ज्यांचा उल्लेख "धारावी अधिसूचित क्षेत्र" असा करण्यात आला आहे.), "विशेष नियोजन प्राधिकरण" म्हणून नेमणूक केली आहे.

आणि ज्याअर्थी, उक्त प्राधिकरणाने महाराष्ट्र प्रादेशिक व नगर रचना अधिनियम, १९६६ च्या कलम ४० (३) (घ) मध्ये दाखल केलेले कलम ११५ प्रमाणे धारावी अधिसूचित क्षेत्राच्या सर्वंकष विकासासाठी या क्षेत्राचे सर्वेक्षण करून जमिनींच्या विकाससंबंधीचे नियोजित जमिन वापर नकाशासह पुनर्वसनास योग्य असे धारावी पुनर्वसन क्षेत्र म्हणून दाखविलेले नियोजन प्रस्ताव महाराष्ट्र शासन, नगर विकास विभाग अधिसूचना टिपीबी ४३१४/८१०/प्र.क्र.२०३/२०१४/नवि-११ दि.०३.०३.२०१६ अन्वये मंजूर झाले असून त्या नियोजन प्रस्तावामध्ये धारावी पुनर्वसन क्षेत्राबाबत खालील परिशिष्टामध्ये नमूद केल्याप्रमाणे अधिक सुयोग्य नियोजनासाठी किरकोळ फेरबदल प्रस्तावित करण्यात आले आहे. ( ज्याला यापुढे " उक्त फेरबदल प्रस्ताव" असे संबोधले जाईल.)

## <u>परिशिष्ट</u>

महाराष्ट्र प्रादेशिक व नगर रचना अधिनियम, १९६६ च्या कलम ४०(३)(घ) मध्ये दाखल केलेल्या कलम ११५ अन्वये धारावी अधिसूचित क्षेत्रासाठी मंजूर झालेल्या नियोजन प्रस्तावामधील सेक्टर क्र.५ मध्ये करावयाच्या बदलाबाबत.

| मंजूर नियोजन प्रस्तावातील तरतूद. | मंजूर नियोजन प्रस्तावात करावयाचे प्रस्तावित फेरबदल. |
|---|---|
| १६८६०९.३३ चौ.मी. क्षेत्र असलेले "माहिम निसर्ग उद्यान" हे धारावी पुनर्वसन क्षेत्रामधून वगळले आहे. | १६८६०९.३३ चौ.मी. क्षेत्र असलेले "माहिम निसर्ग उद्यान" धारावी पुनर्वसन क्षेत्रात समाविष्ट करणेचे आहे. |

आणि ज्याअर्थी, प्राधिकरणाने मंजूर केलेल्या दि. १२.०१.२०१३ रोजीच्या ठराव क्र.१ नुसार, धारावी अधिसूचित क्षेत्राच्या जमिनींच्या विकासासंबंधीच्या नियोजन प्रस्तावासंबंधी, महाराष्ट्र प्रादेशिक व नगर रचना अधिनियम १९६६ च्या कलम ४० (३) (घ) मध्ये दाखल केलेले कलम ११५ नुसार, लोकांच्याकडून काही आक्षेप अगर सूचना मागविण्याच्या असल्यास, त्या मागविणेसाठी जाहीर नोटीस प्रसिध्द करण्यास विशेष नियोजन प्राधिकरणाने मुख्य कार्यकारी अधिकारी तथा विशेष कार्य अधिकारी, धारावी पुनर्विकास प्रकल्प यांना अधिकार प्रदान केले आहेत.

आता, त्याअर्थी या सूचनेद्वारे उक्त फेरबदल प्रस्तावाबाबत जर कोणास आक्षेप घ्यावयाचा असेल अगर काही सूचना करावयाच्या असतील तर त्या त्यांनी सदरहू सुचना प्रसिध्द झाल्यापासून एक

महिन्याच्या आत मुख्य कार्यकारी अधिकारी तथा विशेष कार्य अधिकारी, धारावी पुनर्विकास प्रकल्प, गृहनिर्माण भवन, पाचवा मजला, वांद्रे (पूर्व), मुंबई ४०० ०५१ यांच्याकडे लेखी स्वरूपात पाठवाव्यात.

उक्त फेरबदल प्रस्तावाच्या नकाशांच्या प्रती मुख्य कार्यकारी अधिकारी तथा विशेष कार्य अधिकारी, धारावी पुनर्विकास प्रकल्प, गृहनिर्माण भवन, पाचवा मजला, वांद्रे (पूर्व), मुंबई ४०० ०५१ येथे त्यांच्या कार्यालयात कार्यालयीन कामकाजाच्या दिवशी कार्यालयीन वेळेत लोकांना पाहावयास मिळतील. त्याचप्रमाणे सदर फेरबदल प्रस्तावाबाबतच्या नकाशाच्या प्रती खालील कार्यालयात देखील लोकांना पाहण्यासाठी ठेवण्यात आल्या आहेत:-

१. मुख्य अभियंता,विकास योजना,४ था मजला, मुख्य इमारत, बृहन्मुंबई महानगर पालिका, मुंबई.

२. जिल्हाधिकारी, मुंबई शहर जिल्हा, ओल्ड कस्टम हाऊस, शहिद भगतसिंग मार्ग, फोर्ट, मुंबई ४०० ००१.

३. जिल्हाधिकारी, मुंबई उपनगर जिल्हा, प्रशासकीय इमारत, बांद्रा (पूर्व), मुंबई, ४०० ०५१.

४. उपसंचालक नगर रचना, बृहन्मुंबई, ENSA हट्मेंटस, आझाद मैदान, महापालिका मार्ग, मुंबई, ४०० ००१.

सही /-
(एस.वी.आर.श्रीनिवास)
मुख्य कार्यकारी अधिकारी
तथा विशेष कार्य अधिकारी
धारावी पुनर्विकास प्रकल्प
झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण

ठिकाण : मुंबई
दिनांक : २८.०२.२०१८